पुढारी कोल्हापूर, रविवार, २४ मार्च २०१९

विवेकानंद महाविद्यालयाचा उद्या पदवी प्रदान समारंभ

दै. 'पुढारी'चे व्यवस्थापकीय संपादक डॉ. योगेश जाधव यांची प्रमुख उपस्थिती

कोल्हापूर : प्रतिनिधी

विवेकानंद महाविद्यालयाचा पहिला पदवीदान समारंभ सोमवारी (दि. २५) सकाळी ९.३० वाजता महाविद्यालयाच्या प्रांगणात होणार आहे. दै. 'पुढारी'चे व्यवस्थापकीय संपादक डॉ. योगेश जाधव उपस्थित राहून विद्यार्थ्यांना पदवीप्रदान व मार्गदर्शन करणार आहेत.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ नुसार पदवीदान समारंभ महाविद्यालयातच आयोजित करून विद्यार्थ्यांना पदवीदान करण्यात याव्यात, असे शिवाजी विद्यापीठाने कळविले आहे. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०१७-१८ चा विवेकानंद महाविद्यालयात पदवीदान समारंभ होत आहे. समारंभाच्या अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे असणार आहेत. बी. ए., बी.कॉम., बी. एस्सी., बीबीए, बीसीए. बीसीएस, एम.कॉम., एम.एस्सी.च्या सुमारे ९५० विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रे देण्यात येणार आहेत.

समारंभाला संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, शिवाजी विद्यापीठ अधिकार मंडळातील निमंत्रित सदस्य म्हणून प्राचार्य डॉ. एस. एस. गवळी यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. महाविद्यालयातून मार्च-एप्रिल २०१८ मध्ये पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी, विद्यार्थिनींनी पदवी प्रमाणपत्र घेण्यासाठी सकाळी नऊ वाजता उपस्थित राहावे, असे आवाहन विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, परीक्षा विभाग प्रमुख प्रा. जी. जे. नवाथे यांनी केले आहे.